# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२०/१/२०१०

दि. २०/१/२०१० रोजी घेण्यांत आलेल्या परिवहन समिती सभेचे इतिवृत्त.

३

उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समितीची सभा बुधवार दिनांक २०/१/२०१० रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | **सभापती** श्री. सुनिल एस. गंगवानी | सभापती |
| २ | श्री. कृष्णा गिरीया पुजारी | सदस्य |
| ३ | श्री. मोहन रामसिंग कंडारे | सदस्य |
| ४ | श्री.मिलिंद जगन्नाथ चोडनकर | सदस्य |
| ५ | श्री. जे.के. ढोके | सदस्य |
| ६ | श्री. नामदेव मरसाळे | सदस्य |
| ७ | श्री. विलास डांगे | सदस्य |
| ८ | श्री. आनंद शांताराम शिंदे | सदस्य |
| ९ | श्री. संजय आयोध्याप्रसाद सिंग | सदस्य |
| १० | श्री. आदिनाथ यादवराव जाधव | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जया प्रकाश माखिजा(स्थायी समिती, सभापती), सदस्य २. श्री. राजेश मुरलीधर टेकचंदानी, ३. श्री.लालता प्रसाद शिवमुर्त तिवारी

श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

1. श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त
2. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
3. श्री. ह.न. जमादार, उप मुख्य लेखा परिक्षक
4. श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

1. श्री. तानाजी पतंगराव

दुपारी १२.२५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :— मागील सभेचे दिनांक ९/७/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

काही सदस्य :–पास, पास.....

सभापती, श्री. सुनिल गंगवानी:- मागील सभेचे दिनांक ९/७/२००९ रोजीचे परिवहन समितीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र. १ :– मागील सभेचे दिनांक ९/७/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जे.के. ढोके

अनुमोदकाचे नांव : श्री. आदिनाथ जाधव

परिवहन समिती ठराव क्र. :– ७ अ          दिनांक:– २०/१/२०१०

ही परिवहन समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक ९/७/२००९ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

एकमताने

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. २ :–शहरी व्यवस्थेसाठी बस थांब्याची जागा व वाहतुक पॅटर्न निश्चित करणे

---

सदस्य श्री. मोहन कंडारे :–बसथांबे बांधण्यासाठी जागा आहे का? आपण कोठे कोठे बस थांबे बांधणार आहात?

श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख:–जेथे जागा उपलब्ध असेल तेथे बसथांबे बांधले जातील. याबाबत निविदेंमध्ये आयुक्तांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

सदस्य श्री. मोहन कंडारे:–परिवहन सेवेच्या ९ मार्गांना मंजुरी घेतली आहे. परंतु बस थांबे कोठे कोठे ठेवणार त्यास मंजुरी घेतली आहे का?

श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख:– आम्ही प्रस्तावित करुन मंजुरीस्तव आपणापुढे ठेवले आहे

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :—</u>रस्त्याच्या कडेला एखादा छोटासा टेलिफोन बुथ जरी ठेवायचा झाला तरी त्यासाठी परवानगी घ्यावी लागते. त्यानुसार बस थांब्यांसाठी आपण परवानगी घेतली आहे काय? आराखडा तयार केला आहे काय? चुकीच्या ठिकाणी जर बसथांबा ठेवला व नागरीकांनी /व्यापा—यांनी हरकत घेतली तर काय कराल? यासाठी जे काही बसथांबे आपण तयार करणार आहोत त्यांची जागा सर्वसंमतीने निश्चित झाली पाहिजे. आणि परिवहन सेवेचे काम कायदयानुसार झाले पाहिजे. आपण कुणाशीही विचार विमर्श न करता बस थांब्याची जागा निश्चित केली आहे ते चुकीचे आहे. शासन आणि प्रशासन यांपैकी कुणाचीही परवानगी घेतलेली नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल गंगवानी:—</u>आम्हांला असे माहित पडले आहे की, २७ तारखेला परिवहन सेवेचे उद्घाटन होत आहे? हे कोण करत आहे? कुणाच्या अधिकारात? उद्घाटनाची तारीख कोणी निश्चित केली? ठेकेदाराने? २७ तारखेला मी महाराष्ट्राबाहेर आहे. वाहतुक व्यवस्थापकांचे ठेकेदाराशी संगनमत आहे. जे बस थांबे निश्चित केले आहेत, ते रद्द केले जावेत. जोपर्यंत परिवहन समिती बसथांबे निश्चित करीत नाही, तोपर्यंत बस थांब्याचे काम थांबविले जावे. परिवहन सेवेच्या उद्घाटनासाठी आम्हाला मा. मुख्यमंत्र्यांना बोलवायचे आहे. यासाठी परिवहन सेवेच्या उद्घाटनासाठी आम्ही जी तारीख देवु त्या तारखेसच उद्घाटन झाले पाहिजे. आता परिवहन सेवेचे उद्घाटनाचा कार्यक्रम आपण निश्चित केला परंतु परिवहन समितीच्या सभापती आणि परिवहन समितीलाच हे माहित नाही. हे काय चालले आहे?

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :—</u>काही दुकानांच्या समोर बसथांबे लागत असल्याने व्यापा—यांचा त्यास विरोध आहे. आपण आपल्या मनाप्रमाणे वाटेल तसे बसथांबे निश्चित करत आहात. हे चुकीचे आहे.

<u>सदस्य श्री. मिलिंद चोडनकर :—</u>परिवहन सेवा सुरु होत आहे हे शहरात एक विधायक काम होत आहे. त्यास विरोध करण्याचा आमचा प्रयत्न नाही. बस सेवा चांगली आहे. ती सुरु राहीली पाहिजे. लोकांना तिचा फायदा मिळाला पाहिजे परंतु परिवहन सेवेचे उद्घाटन करतांना समितीला विश्वासात घेतले पाहिजे.

<u>श्री. संतोष देहेरकर (उप—आयुक्त):—</u>२८ जानेवारी २०१० ला निविदेची मुदत संपते. त्या अगोदर परिवहन सेवेचे उद्घाटन केले नाही तर निविदा रद्द होवु शकते. म्हणुन २८ तारखेच्या अगोदरची २७ तारीख उद्घाटनासाठी निश्चित केली आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल गंगवानी :—</u>ठेकेदार चांगला आहे. बसेसही चांगल्या आहेत. ठेकेदार बदली करण्याचा आमचा काही मानस नाही. या ठेकेदारास आम्ही मुदतवाढ देवु. आपण दुस—या सभेत हा प्रस्ताव आणा.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे:—</u>परिवहन सेवा सुरु करण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या मिळविण्याकामी त्यांनी पाठपुरावा केला आहे आणि त्याचे कामही चांगले आहे.

<u>सदस्य श्री. मिलिंद चोडनकर :—</u>चार,चार, पाच,पाच महिने समितीच्या सभा होत नाहीत. प्रत्येक महिन्यात परिवहन समितीची सभा झाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. जे.के. ढोके :—</u>सहा, सहा महिने समितीची सभा होत नाही. तर परिवहन समितीचा फायदा काय?

<u>सदस्य श्री. मिलिंद चोडनकर:—</u> इतर महानगरपालिकांमध्ये परिवहन समितीच्या वेळोवेळी सभा होतात परंतु येथे सहा, सहा महिने सभा होत नाहीत. हे बरोबर नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल गंगवानी :—</u>सहा, सहा महिने परिवहन समितीची सभा होत नाही याबाबतीत नगरविकास विभागाचे प्रधान सचिव श्री. मनुकुमार श्रीवास्तव साहेब यांच्याकडे मी तक्रार केल्यानंतर आता कुठे परिवहन समितीची सभा होत आहे. परिवहन समितीमध्ये जर काही अनियमितता किंवा एखादे बेकायदेशीर काम झाले तर त्याची संपुर्ण जबाबदारी आम्ही आयुक्तांवर टाकु.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :—</u>बस थांबा कुठे असावा आणि कुठे नसावा याबाबतीत श्री. भारत राजवानी यांच्या प्रभागात नेताजी येथे काल दोन दुकानदारांचे आपसात भांडण झाले. एक म्हणतो माझ्या दुकानासमोर बस थांबा

नको पुढे लावा. तर पुढचा म्हणतो माझ्याही दुकानासमोर बस थांबा नको. असे जर होत राहिले तर काय करणार?

<u>सदस्य श्री. मिलिंद चोडनकर:–</u>परिवहन सेवा सुरु केल्यानंतर बस थांबे निश्चित करावे लागतीलच. आणि हा बस थांबा कुण्यान कुण्या दुकानदाराच्या दुकानासमोर लावावा लागणारच आहे. मुंबई मध्ये दुकानांच्यासमोर बसथांबे असल्याचे आपण पाहतोच.काही मिळविण्यासाठी काही त्याग करावा लागतो त्यानुसार परिवहन सेवेसारखी चांगली सेवा मिळविण्यासाठी दुकानदारांनी आपल्या दुकानासमोरील जागा बस थांब्यासाठी दिली पाहिजे. थोडाफार त्याग केला पाहिजे.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :–</u>हा ठेकेदार बदलण्याचा आमचा काही इरादा नाही. यालाच आम्ही मुदतवाढ देवु परंतु हे सर्व काम कायदयानुसार झाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. आदिनाथ जाधव :–</u>राज्य महामंडळाने एसटीचे ज्याठिकाणी बसथांबे ठेवलेले आहेत तेथे महापालिकेच्या परिवहन सेवेचे बसथांबे ठेवले तर लोकांना ते माहित पडतील आणि कुणाचा विरोधही होणार नाही.

<u>सदस्य श्री. मिलिंद चोडनकर:–</u>एसटी महामंडळाचे बस थांबे लोकांना माहित असतात तेथेच परिवहन सेवेचे बसथांबे ठेवले जावेत.

<u>सदस्य श्री. जे.के. ढोके:–</u>एसटी महामंडळाचे बस थांबे आहेत तरी किती आणि कुठे? सर्व तुटले आहेत नावाला सुध्दा उरलेले नाहीत. यासाठी २३ किंवा २४ तारखेला एक सभा ठेवा आणि त्या सभेत बस थांब्यांबाबतीत निर्णय घेतला जावा.

<u>महापालिका सचिव :–</u>बसथांबे निश्चित करण्याबाबतीत आपण बोलत आहात. परंतु त्याबाबतीत आपणांस नगररचनाकारांकडुन अभिप्राय घ्यावे लागतील.

<u>सदस्य श्री. कृष्णा पुजारी :–</u>आपण ज्या दहा बस चालु करणार आहोत त्यांना कोठे कोठे बसथांबे देणार आहोत? त्या जागा निश्चित झाल्या पाहिजे.

<u>सदस्य श्री. मिलिंद चोडनकर:–</u>एसटीचे जे बसथांबे आहेत, तेथे व जेथे जागा उपलब्ध आहेत अशी जी ठिकाणे प्रशासन सुचवेल तेथे तेथे बसथांबे निश्चित केले जावेत.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे:–</u> आपण परिवहन सेवा सुरु करत आहोत परंतु शहरातील रस्ते व्यवस्थीत आहेत काय? प्रथम ते व्यवस्थीत करा. बहुतांश रस्ते फेरीवाले व हातगाडयावाल्यांनी व्यापले आहेत. बस फिरण्यास जागा नाही.

<u>श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख:–</u>आपली मिनी बस आहे. ती फिरण्यास काही अडचणीचे होणार नाही.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :–</u>रस्त्यांवर खड्डे जरी असले तरी ते भरुन घेतले जावेत. नाहीतर नागरीक आपणांस नावे ठेवतील. परिवहन सेवेसारखी चांगली सेवा सुरु करायची आणि अशा एक दोन कारणामुळे लोकांचे शिव्याशाप खायचे हे बरे नाही. आणि आरटीओची आपण मान्यता घेतलेली आहे काय?

<u>श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख :–</u>आरटीओने मान्यता दिलेली आहे.

<u>सदस्य श्री. कृष्णा पुजारी :–</u>बसथांब्यांबाबतीत नगररचनाकारांचा अभिप्राय घेतला जावा.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :–</u>बस थांब्यांबाबतीत एखादया दुकानदाराने हरकत घेवुन जर तो कोर्टात गेला तर आपली संपुर्ण परिवहन सेवा बंद होईल. कालच एका दुकानदाराने सांगितले की, माझ्या दुकानासमोरील बस थांबा हटविला नाही तर मी कोर्टात जाईन.

**<u>सदस्य श्री. कृष्णा पुजारी :–</u>**गोल मैदाना पासुन नेहरु चौकापर्यंत च्या रस्त्यावर गाडया व टेम्पो लागतात तेथुन आपल्या गाडया जाणार येणार कश्या याचाही विचार केला पाहिजे.

**<u>सभापती, श्री. सुनिल गंगवानी:–</u>**परिवहन सेवेचे उद्घाटन परिवहन समिती व समितीचे सभापती यांना विश्वासात घेतल्याशिवाय केले जावु नये. तसेच बसथांब्यांच्या बाबतीतही परिवहन समितीला विश्वासात घेतल्याशिवाय निर्णय घेतला जावु नये.

**<u>महापालिका सचिव :–</u>**एकंदरित आपले असे म्हणणे आहे की, बसथांब्यांची ही जी यादी देण्यात आलेली आहे, ती नगररचनाकारांच्या अभिप्रायासह पुन्हा सादर केली जावी. तसेच परिहवन सेवेचे उद्घाटन परिवहन समिती सभापतींशी विचारविमर्श केल्याशिवाय करु नये. २७ तारखेला उद्घाटन करण्याची ठेकेदाराची पुर्ण तयारी आहे. त्यामध्ये त्याची काहीही कमतरता नाही. त्यामुळे त्याच्या निविदेवर याचा काहीही परिणाम होणार नाही. असेच ना?

**<u>काही सदस्य :–</u>**होय बरोबर. याप्रमाणे ठराव पारीत केला जावा.

**<u>सभापती, श्री. सुनिल गंगवानी:–</u>** सदरच्या विषयाबाबत पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :– शहरी व्यवस्थेसाठी बस थांब्याची जागा व वाहतुक पॅटर्न निश्चित करणे**

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे शहर बस सेवा बीओओटी तत्वावर सुरु करावयाच्या निविदा डिसेंबर २००८ साली मागविण्यात आल्या व सदर निविदा दिनांक ५/१/२००९ रोजी उघडण्यात आल्या व मे. केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. उल्हासनगर यांची सर्वात जास्त दर व महापालिकेस मिळणार रॉयल्टी रु. ०.५५ प्रति कि.मी. ची निविदा प्राप्त झाली व सदर निविदेस मा. परिवहन समितीने ठराव क्रमांक ६ दिनांक २७/२/२००९ अन्वये मंजुरी दिली.

मा. परिवहन समिती सभापती यांचे पत्र दिनांक १९/११/२००९ अन्वये मा. सभापती, परिवहन समिती यांनी उल्हासनगर शहरामध्ये नव्याने सुरु होणा–या शहरी व्यवस्थेसाठी बस थांब्याची जागा निश्चित करण्यासाठी व वाहतुक पॅटर्न निश्चित करणे या विषयावर चर्चा करणेबाबत मा. परिवहन समितीची बैठक आयोजित करण्यास विनंती केलेली आहे.

या अनुषंगाने मा. परिवहन समिती, सभापती यांनी कळविल्यानुसार उल्हासनगर शहरामये नव्याने सुरु होणा–या शहरी व्यवस्थेसाठी विविध ठिकाणी बस थांब्याची जागा निश्चित करण्यासाठी व उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहतुक पॅटर्न निश्चित करणे या विषयावर चर्चा करण्यासाठी गोषवारा मा. परिवहन समितीपुढे सादर करण्यांत येत आहे.

<u>परिवहन समिती ठराव क्रं. ७ ब</u> <u>दिनांक २०/१/२०१०</u>

सूचकाचे नाव श्री. जे.के. ढोके :

अनुमोदकाचे नाव : श्री. मोहन कंडारे

ही परिवहन समिती शहरी व्यवस्थेसाठी बस थांब्याची जागा व वाहतुक पॅटर्न निश्चित करण्याचा प्रस्ताव खालील कारणांमुळे वगळण्यास मान्यता देत आहे.
१) प्रशासनातर्फे देण्यात आलेल्या बस थांब्याच्या जागांची सूची नगररचना विभागाचे अभिप्रायासह फेरसादर करणे आवश्यक आहे.

२) जोपर्यंत बस थांब्याच्या जागाची सूची या समितीद्वारे निश्चित करण्यांत येत नाही तोपर्यंत बस सेवा सुरु करता कामा नये. तसेच बस सेवा सुरु करण्याचा मुहुर्त या समितीच्या ठरावाशिवाय निश्चित करु नये.
३) ठेकेदारांच्या निविदेचा वैधता कालावधी दिनांक २८ जानेवारी, २०१० रोजी संपृष्टात येण्यापूर्वी वरील दोन कारणांमुळे जर बस सुरु करता येत नसेल तर वाढीव कालावधी प्रयोजनार्थ निविदेची वैधता कायम समजण्यांत येईल.

सूचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सभापती, श्री. सुनिल गंगवानी:—या सभेचे कामकाज संपल्याचे मी जाहीर करतो

दुपारी १२.४५ वाजता सभापती श्री. सुनिल गंगवानी यांनी सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१७/४/२०१०

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १७/४/२००९ रोजीच्या परिवहन समिती सभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची परिवहन समितीची सभा शनिवार दिनांक १७/४/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत **श्री. सुभाष सोनवणे, जिल्हाधिकारी, रायगड (अलिबाग)** हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| अ.क्र. | सदस्याचे नाव |
|---|---|
| १ | सभापती श्री. सुनिल एस. गंगवानी |

| | |
|---|---|
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा, सदस्य, (स्थायी समिती, सभापती) |
| ३ | श्री. कृष्णा गिरीया पुजारी, सदस्य |
| ४ | श्री. राजेश मुरलीधर टेकचंदानी, सदस्य |
| ५ | श्री. मोहन रामसिंग कंडारे, सदस्य |
| ६ | श्री.लालता प्रसाद शिवमुर्त तिवारी, सदस्य |
| ७ | श्री.मिलिंद जगन्नाथ चोडनकर, सदस्य |
| ८ | श्री. जे.के. ढोके |
| ९ | श्री. नामदेव मरसाळे |
| १० | श्री. विलास डांगे |
| ११ | श्री. आनंद शांताराम शिंदे |
| १२ | श्री. संजय आयोध्याप्रसाद सिंग |
| १३ | श्री. आदिनाथ यादवराव जाधव |

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. जी.टी. जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
५. डॉ. राजा रिजवानी, वैदयकीय अधिकारी
६. श्री. भगवान कुमावत, प्र.प्रभाग अधिकारी
७. श्री. बबीश गंगारामानी, उप अभियंता, विद्युत

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती अमिता संखे
४. श्रीमती नर्गिस खान

दुपारी ३.३३ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ मधील नियम–४ अन्वये विशेष समिती सभापती पदाची नेमणूक करण्यासाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सुभाष सोनवणे, जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

➩ **विषय क्र. १ :–** परिवहन समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.

---

**श्री. सुभाष सोनवणे (पीठासीन अधिकारी):–**

**परिवहन समिती सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** १३/४/२०१० रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये ३ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून ते अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत:–

| अ क्र | उमेदवाराचे नाव व पत्ता | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुनिल साहेबराय गंगवानी | श्री. संजय आयोध्याप्रसाद सिंग | श्री. आदिनाथ यादवराव जाधव |
| | श्री. राजेश मुरलीधर टेकचंदानी | श्री. मोहन रामसिंग कंडारे | श्री. आनंद शांताराम शिंदे |
| | श्री. मिलिंद जगन्नाथ चोडणकर | श्री. कृष्णा पुजारी | श्री. विलास डांगे |
| | श्री. मिलिंद जगन्नाथ चोडणकर | श्री. कृष्णा पुजारी | श्री. विलास डांगे |

**परिवहन समिती सभापती** पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ नियम–०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे मराठी वर्णानुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:–

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. गंगवानी सुनिल साहेबराय |
| २. | श्री. चोडणकर मिलिंद जगन्नाथ |
| ३ | श्री. चोडणकर मिलिंद जगन्नाथ |
| ४ | श्री. टेकचंदानी राजेश मुरलीधर |

यावेळेस ३.३३ मिनिटे झाली आहेत.

वरील ४ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. अशा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील विहित नमुन्यामधील अर्ज भरुन देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

आता ३.४८ वाजले आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

दिलेल्या वेळेमध्ये १) श्री. गंगवानी सुनिल साहेबराव व २) श्री. टेकचंदानी राजेश मुरलीधर या दोन उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली.

आता, परिवहन समिती सभापती पदाच्या एका जागेसाठी एकमेव उमेदवार रिंगणात शिल्लक राहिल्याने त्याची निकाल घोषणा मी पुढीलप्रमाणे घोषित करीत आहे.

# निकाल घोषणा

महापालिका सचिवांनी दिनांक ९/४/२०१० रोजी काढलेल्या सूचने अन्वये **परिवहन समितीच्या** सर्व सदस्यांना **परिवहन समिती** सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक १३/४/२०१० रोजी ३ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी दोन उमेदवारांनी दिनांक १७/४/२०१० रोजी विहित मुदतीत

आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यामुळे एकमेव उमेदवार ***श्री. चोडणकर मिलिंद जगन्नाथ*** हे रिंगणात शिल्लक राहिले आहेत.

**परिवहन समिती** सभापती पदासाठी एकमात्र उमेदवार राहिले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ च्या नियम–६ मधील पोटनियम–१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये **परिहवन समिती** सभापती पदाचे उमेदवार ***श्री. चोडणकर मिलिंद जगन्नाथ*** हे **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :–१७/४/२०१०

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका सभागृह

(सुभाष सोनवणे)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी

यावेळी दुपारी ३.५२ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका